**नियमित दिवाणी कब्जा क्र. १२८/२००३ मधील नि.क्र. ११८ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०६/१२/२०२५)

श्रीमती नवसाबाई मारुती ताडे (मयत वारस) वगैरे वि. श्री. खंडु गोपाळा मोरे वगैरे ३

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, सदर दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द कब्जासाठी, हक्कज्ञापनासाठी व वाटपासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा न्यायनिर्णयाकरीता प्रलंबित असताना वादी क्र. २ इंदुबाई बाळकृष्ण कांबळे या दि. १४.१२.२००६ रोजी मयत झाल्या आहेत. इंदुबाई बाळकृष्ण कांबळे यांनी त्यांचे हयातीमध्ये दि. ०४.१२.२००६ रोजी रजि.दस्त क्र. ७३१/२००६ अन्वये करुन ठेवलेल्या नोंदणीकृत मृत्यूपत्रान्वये किरण बाळकृष्ण कांबळे हे सदर दावेस वादी म्हणून वारस रेकॉर्डवर आलेले आहेत. तसेच दि.०१/०९/२००७ रोजी नवसाबाई मारुती ताडे यांनी केलेल्या मृत्युपत्रान्वये अशोक बाळकृष्ण कांबळे हे वादी म्हणून पक्षकार झालेले आहेत. सदर दोन्ही मृत्यूपत्राबाबत आणि नवीन वादींना येत असलेल्या सदर मृत्युपत्रान्वयेच्या अधिकार व हक्कांबाबत कथने करण्याच्या अनुषंगाने वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदरील अर्जास प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचे म्हणणे (नि. १२१) वर दाखल केलेले असून वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज बेकायदेशीर व चुकीचा असून सदरची दुरुस्तीची मागणी प्रस्तुत प्रतिवादीना मान्य व कबूल नाही. प्रस्तुत दावा दुरुस्तीचा अर्ज प्रामाणिकपणाचा नसून बेकायदेशीर व पश्चातबुध्दीचा आहे. वादीने दावा दुरुस्तीच्या अर्जास कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. प्रस्तावित दुरुस्ती वादी हे दावेतील त्रुटी व उणीवा भरुन काढणेच्या प्रयत्नात असून सदर दुरुस्तीमुळे दावेत आतापर्यंत झालेल्या पुरावेवर परिणाम होणार आहे. तथाकथित वारस रेकॉर्डवर आल्यानंतर वादींनी चार वेळा दावा दुरुस्त केलेला आहे. वादींना तोंडी पुरावा झालेनंतर अशाप्रकारची दुरुस्ती करता येणार नाही. तथाकथित मागणी मुदतीत नाही. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे मूळ स्वरुप बदलेल. सबब, सदरचा वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावी अशी विनंती

प्रतिवादी क्र. ३ यांनी केली आहे. प्रतिवादी क्र.१ तर्फे दाखल पुरसिस (नि.१२३) अन्वये प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांनी दिलेले म्हणणे मान्य करुन सदरचे म्हणणे त्यांचेतर्फे वाचण्यात येणेबाबत कथन केले. वारंवार पुरेशी संधी देवूनही प्रतिवादी क्र. २ तर्फे प्रस्तुत अर्जात म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ चे म्हणणेविना पुढे चालविण्यात येतो.

४. वादी व प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वारंवार पुरेशी संधी देवूनही प्रतिवादी क्र. २ तसेच त्यांचेतर्फे युक्तीवादासाठी कोणीही हजर न झाल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ चे युक्तीवादाविना पुढे चालविण्यात येतो. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीचे विद्वान वकीलांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्ठयर्थ खालील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली:–

Life Insurance Corporation of India Vs. Sanjeev Builders Private Limited, AIR 2022 SC 4256

उपरोक्त नमुद न्यायनिर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

५. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी दावा हा कब्जासाठी, हक्कज्ञापनासाठी व वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जातील परिच्छेद ३(अ) मधील मजकूर दावा अर्जी कलम ७ नंतर उपकलम म्हणून जादा मजकूर समाविष्ट करण्यास व तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. सदर प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर दुरुस्तीअन्वये वादी क्र. १ श्रीमती नवसाबाई मारुती ताडे यांनी दि.०१/०९/२००७ रोजी दावा मिळकतीमध्ये त्यांना येणा–या कायदेशीर हिश्श्याबाबत रजिस्टर दस्त क्र. १५६५/२००७ अन्वये करुन ठेवलेल्या मृत्युपत्रान्वये वादी अशोक बाळकृष्ण कांबळे यांना दावा मिळकतीत हक्क, अधिकार व हिस्सा येत असून ते सदर हिश्श्याचे मालक झालेले असल्याने तसेच दि. ०४/०५/२००६ रोजी इंदुबाई बाळकृष्ण कांबळे यांनी करुन ठेवलेल्या मृत्युपत्रान्वये वादी किरण बाळकृष्ण कांबळे यांना दावा मिळकतीमध्ये हक्क, अधिकार व हिस्सा येत असून सदर मृत्युपत्रान्वये ते वादी इंदुबाई बाळकृष्ण कांबळे यांच्या हिश्श्याचे मालक झालेले आहेत. सदर दुरुस्तीअन्वये वादींना प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावे करुन दिलेले दि. २२/०८/२०२२ रोजीचे खरेदीपत्र हे

मूळ वादी यांनी प्रस्तुत वादीच्या नावे करुन ठेवलेल्या मृत्युपत्रांच्या हक्कावर बंधणकारक नसलेबाबत तसेच त्यांचा दावा मिळकतीत प्रत्येकी १/४ हिस्सा येत असल्याने सदर प्रस्तुत वादींना सदरचा दावा चालविण्याचा हक्क व अधिकार प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्यामध्ये वादींनी दुरुस्ती सुचवलेली आहे.

६. वास्तविक पाहता, अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणातील वादी क्र. १ नवसाबाई मारुती ताडे यांचे वारस म्हणून अशोक बाळकृष्ण कांबहे तसेच वादी क्र.२ इंदुबाई बाळकृष्ण कांबळे यांचे वारस म्हणून किरण बाळकृष्ण कांबळे हे प्रस्तुत दाव्यामध्ये नि.९१, ९२ व नि.३४ वरील आदेशावरुन वादी म्हणून सामील झालेले आहेत. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता नि.३९ वरील हुकूमानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती केल्याचे दिसून येते.

७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दि. ०८/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये माझे विद्वान पिठासीन पुर्वाधिकारी यांनी वादीचा पुरावा बंद केलेला आहे. दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता प्रस्तावित दुरुस्ती मूळ वादी यांनी त्यांच्या हयातीमध्ये करुन ठेवलेल्या मृत्युपत्रान्वये स्पष्टीकरणात्मक अशी असून मृत्युपत्राआधारे दाव्याच्या कथनामध्ये स्पष्टता येण्यासाठी प्रस्तुतची दुरुस्ती वादींनी सुचविलेली आहे. वास्तविक पाहता, सदरची प्रस्तावित दुरुस्ती वादीच्या नावे करुन दिलेल्या मृत्युपत्रान्वये सुचविण्यात आल्याचे दिसून येते. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलेल असे निश्चितच वाटत नाही. प्रस्तुतचा दावा जवळपास २० वर्षांहूनही जुना असून सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यास वादींनी केलेल्या विलंबाबात त्याअनुषंगाने वादींवर खर्च बसविणे न्यायोचित ठरते. सबब, दुरुस्तीचा व अर्जातील नमुद कारणांचा विचार करता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

## <u>– आ दे श –</u>

१) अर्ज (निशाणी क्र.११८) वादी यांनी प्रतिवादी यांना प्रत्येकी रक्कम रु. १२००/– खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2025.12.06 17:08:55 +0900

कागल. (प्रणिता एस.पाटील)

दिनांक – ०६/१२/२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.